**वृत्तपत्रांसाठी वितरण**
आयपीआर १६०६ एन ०५१०

मे २८, २०१०

**निधी हस्तांतरणाच्या खोट्या ऑफर्सना बळी पडू नका - आरबीआयचा सल्ला**

रिझर्व बँकेने २६ मे २०१० रोजी बँकांना सल्ला दिला होता की त्यांनी, खोट्या ऑफर्सच्या बाबतीत, म्हणजे, बक्षिसाची/पारितोषिकाची रक्कम हस्तांतरीत करता यावी ह्यासाठी व्यावहारिक शुल्के इत्यादी जमा करण्यासाठी जेथे बँकेत खाती उघडली जातात आणि/किंवा असे व्यवहार करण्यात येतात अशा खोट्या ऑफर्सबाबत अत्यंत सावधानता बाळगावी. रिझर्व बँकेने स्पष्ट केले आहे की, भारतात रहिवासी असलेली कोणतीही व्यक्ती अशी प्रदाने गोळा करीत असल्यास व प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे त्यांचे भारताबाहेर प्रेषण करत असल्यास, ती व्यक्ती, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९ चे उल्लंघन केल्याबद्दल आणि त्याचप्रमाणे तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) निकषांचे/अटी - मनी लॉडरिंग मानकांचे उल्लंघन केल्याबद्दल दोषी धरली जाईल.

रिझर्व बँकेने पुनश्च सांगितले आहे की, विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम, १९९९, लॉटरी योजनांमध्ये भाग घेण्यासाठी कोणत्याही स्वरुपात प्रेषण करण्यास मनाई करतो. हे निर्बंध, मनी सर्क्युलेशन योजना अशा लॉटरी सारख्या योजनांमध्ये भाग घेण्यासाठी किंवा बक्षिसांची/पारितोषिकाची रक्कम मिळविण्यासाठी प्रेषण करण्यासाठीही लागु आहेत.

बँकांना पाठविलेल्या परिपत्रकात रिझर्व बँकेने सांगितले आहे की, लबाड लोकांकडून स्वस्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत असलेल्या ऑफर्सचा सुळसुळाट झाला आहे. आणि अशा ऑफर्स, पत्रे, ई-मेल्स, मोबाईल फोन्स, एसएमएस इत्यादींमार्फत आल्या होत्या. अशा लबाड लोकांच्या कार्यरीतींची माहिती देताना रिझर्व बँकेने सांगितले की, असे संदेश सावजांना रिझर्व बँकेच्या खोट्या लेटरहेड्सवर पाठविण्यात येत होते व त्यावरील सही सर्वोच्च /ज्येष्ठ अधिकाऱ्यांची असल्याचे भासविण्यात येत होते. ह्या ऑफर्सना अनेक लोक बळी पडले व ते खूप मोठ्या प्रमाणावर पैसे गमवून बसले. रिझर्व बँकेच्या नजरेस असेही आणण्यात आले आहे की, अशा लबाड लोकांनी त्यांच्या सावजांकडून निरनिराळ्या शीर्षकाखाली पैसा गोळा केले, जसे, प्रक्रिया शुल्क/व्यवहार शुल्क/ टॅक्स क्लियरन्स आकार / परिवर्तन आकार, क्लियरिंग फी इत्यादी. असे व्यवहार - शुल्क गोळा करण्यासाठी हे लबाड लोक निरनिराळ्या व्यक्ती, किंवा मालकी कंपन्यांच्या नावे बँका व बँक शाखांमध्ये अनेक खाती उघडतात. हे लाबाड लोक ह्या खात्यांमध्ये विशिष्ट रक्कम जमा करण्यास सावजांना भाग पाडतात. ही रक्कम त्यानंतर लगेच काढून घेतली जाते आणि सावजे अडचणीत येतात.

वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून, रिझर्व बँकेने भूतकाळात जनतेला अनेकदा सावधानतेचा इषारा दिला आहे. अशा प्रकारच्या अनेक जनजागरण मोहिमा सुरु करण्याची योजना आहे. रिझर्व बँकेने, ह्या परिपत्रकातील मजकूर, आपल्या संबधित ग्राहकांच्या नजरेस आणण्यास व त्याला प्रसिद्धी देण्यास बँकांना सांगितले आहे.

**अल्पना किल्लावाला**
मुख्य व्यवस्थापक

वृत्तपत्रांसाठी वितरण : २००९-२०१०/१६०६